


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३२४ वा ● रविवार १४ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 324 | Date : 14/04/2024 blow Sunday Page 4 Price 4



# संपादकीय

## घायाळ करण्याची क्षमता असते.

सर्वच राजकीय पक्ष आणि त्यांचे राष्ट्रीय नेते, प्रादेशिक नेते, स्थानिक नेते, उपनेते सोशल मीडियावर सक्रिय झाले आहेत. जे या व्यवस्थेत सक्रिय नाहीत, त्यांना अलगदपणे बाजूलाही केले जात आहे. आपली बाजू मांडण्यासाठी, मुद्दा पटवून देण्यासाठी, जुन्या गोष्टी उकरून काढण्यासाठी, नवी स्वप्ने दाखवण्यासाठी, आश्वासने देण्यासाठी, न पाळलेली आश्वासने आठवून देण्यासाठी सर्वाधिक वापर कशाचा केला जातो, असा प्रश्न अगदी सहजपणे कोणालाही विचारला तर त्याचे उत्तर सोशल मीडिया असेच येते. फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, यू ट्यूब, व्हॉट्सॲप या सगळ्याच व्यासपीठांच्या साहाय्याने आपापला अजेंडा पुढे घेऊन जाण्याचे काम चालू आहे. निवडणुकीच्या धामधुमीमुळे सोशल मीडियावर सध्या राजकीय स्वरूपाच्या पोस्टचे प्रमाण वाढले आहे. आम्ही केलेली कामे, त्यांनी न केलेली कामे, आमचे कसे बरोबर, त्यांचे कसे चूक, आजच्या बैठका, उद्याचे प्लॅनिंग असे सगळेच पोस्टच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविले जाते. त्यापैकी काही पोस्टना चांगली एंगेजमेंटही मिळते. म्हणजेच लोक त्या पोस्ट लाइक करतात, त्यावर कमेंट करतात आणि गरज पडली तर आपल्या वॉलवर शेअरही करतात. पण या एंगेजमेंटमध्ये सर्वाधिक मजेशीर काही असेल तर या पोस्टखाली येणाऱ्या कमेंटस्. या कमेंटस् वाचताना एक गोष्ट अनेकांच्या मनात येते. कसे सुचते यांना हे सगळे? एकतर पोस्टच्या तुलनेत अत्यंत कमी शब्दांत कमेंट लिहिलेली असते, पण त्यातून त्या पोस्टमधील विसंगती, खोटारडेपणा ठळकपणे उघड केला जातो. पोस्टमध्ये केलेल्या दाव्यातील फोलपणा एका वाक्यात निकाली काढला जातो. त्यामुळेच या कमेंटस् रंजक होत जातात. मोबाइलमुळे समाजात वाढलेला एकलकोंडेपणा, व्यग्र दिनचर्या यामुळे भेटून एकमेकांशी बोलायला वेळ मिळत नाही. पूर्वी जसे लोक गावात पारावर बसून बोलायचे तसे आता सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या मतांवर, विविध पोस्टखाली केलेल्या कमेंटस् नेते वाचत असतील. अशी त्यांची भाबडी समजूत नक्कीच नाही, पण समोर जे काही सुरू आहे ते डोळे झाकून आम्ही स्वीकारतो आहोत. तुम्ही जे काही सांगता आहात ते सगळे आम्हाला खरेच वाटत आहे, अशी समजूत राजकीय नेत्यांनी किंवा पक्षांनीही करून घेऊ नये, असेच त्यांना आपल्या कमेंटस्च्या माध्यमातून सांगायचे असते. त्यामुळे या कमेंटस् नीटपणे वाचल्या तर त्या तिरकस असल्याचे ठळकपणे दिसते. त्यात हलक्या-फुलक्या शब्दांत समोरच्या व्यक्तीला घायाळ करण्याची क्षमता असते.

# अर्थतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शोषितांचे वंचितांचे गोरगरिबांचे कष्टक ऱ्यांचे, मजुरांचे, महिलांचे, कैवारी होते, पण डॉ बाबासाहेब आंबेडकर हे प्रचंड मोठे अर्थतज्ज्ञ ही होते. इतकेच नाही तर ते कृषितज्ज्ञ, जलतज्ज्ञ उद्योगतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, परराष्ट्र धोरण तज्ज्ञ, पत्रकार, लेखक आणि समाजसुधारक असे अष्टपैलू व्यक्ती होते.आज १४ एप्रिल डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती आहे. त्यानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आर्थिक दूरदृष्टी आणि अर्थविषयक विचार यांचा घेतलेला लेख डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणारा आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचितांचे कैवारी तर होतेच, पण जगद्विख्यात अर्थतज्ज्ञदेखील होते. त्यांचा मूळ अभ्यासविषय अर्थशास्त्र हाच होता. त्यांनी अर्थविषयक सखोल विचार मांडले आहेत. अर्थशास्त्रामध्ये नोबेल पारितोषिकप्राप्त अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन बाबासाहेबांना अर्थशास्त्रातील गुरू मानतात. अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांनी मोठे व व्यापक योगदान दिले आहे. त्यांच्या कारकिर्दीचे ढोबळमानाने दोन भाग करता येतात. साधारण एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी केलेल्या लिखाणाचा आणि त्यानंतरच्या दुसऱ्या कालखंडात ते एक राजकीय, सामाजिक, दलितोद्धारक नेते म्हणून उदयाला आले. या काळात त्यांनी मानवी हक्कांचा जागर करीत शोषित, पीडित समाजासाठी उदंड कार्य केले.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए.साठी 'प्राचीन भारतीय व्यापार' व पीएच.डी.साठी 'ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थरचनेची उत्क्रांती' असे त्यांचे विषय होते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डी.एस्सी.साठी त्यांनी 'रुपयाचा प्रश्न' हा प्रबंध लिहिला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेला बाबासाहेबांच्या हिल्टन यंग कमिशनच्या शिफारसींचा आधार होता. या शिफारसी करताना आयोगाने बाबासाहेबांच्या 'रुपयाचा प्रश्न' या प्रबंधातील माहितीचा आधार घेतला होता. पुढे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना १९३४ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्यानुसार झाली. त्यानंतर १ एप्रिल १९३५ रोजी आरबीआयने आपले कामकाज सुरू केले. या आयोगापुढे बाबासाहेबांनी दिलेली साक्ष महत्त्वाची ठरली होती. या प्रबंधाने भारतीय अर्थविश्वात आणि त्याची सगळी सूत्रं हाती असलेल्या तत्कालीन ब्रिटिश अर्थविश्वात निर्णायक भूमिका बजावली. त्यातून घेतल्या गेलेल्या निर्णयांनी आज जगात पाचव्या स्थानावर पोहोचलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी निर्माण झालेली सक्षम संस्था म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया निर्माण झाली.

बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात डबल एम.ए. - पीएच.डी. आणि लंडन विद्यापीठातून (सध्याच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स) एम.एस्सी - डी.एस्सी पदव्या मिळवल्या. अर्थशास्त्रामध्ये पीएच.डी. आणि अर्थशास्त्रामध्ये दोन डॉक्टरेट मिळवणारे डॉ. आंबेडकर हे पहिले दक्षिण आशियाई व्यक्ती आहेत. डी.एस्सी. ही डॉक्टरेट पदवी मिळवणारे बाबासाहेब हे पहिले आहेत. तसेच हीच डी.एस्सी. पदवी लंडन विद्यापीठातून मिळवणारे आतापर्यंतचे एकमेव भारतीय आहेत.

जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजारांचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आणखी एक विद्वत्तापूर्ण कार्य होय. 'जातींचा उच्छेद' या आपल्या पुस्तकात त्यावर कडाडून टीका केली होती. जाती व्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून श्रमिकांचीच विभागणी केली गेली आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ. आंबेडकरांचा जाती व्यवस्थेवरील हल्ला हे केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नव्हते, तर आर्थिक विकासाशी त्याच्या मांडणीचा जवळचा संबंध होता. जाती व्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे बाबासाहेबांचे प्रतिपादन होते.

१९४८-४९ मध्ये घटना समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय राज्यघटनेला आकार देतानाही त्यांच्यातील जागृत अर्थतज्ज्ञ आपल्याला दिसून येतो. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे ते खंदे पुरस्कर्ते होते आणि सामाजिक-आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्षून राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही, असा इशारा द्यायलाही ते विसरले नव्हते. स्टेट्स अँड मायनॉरिटीज नावाने ब्रिटिश सरकारला १९४७ साली सादर केलेल्या टिपणांमध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती, हे सांगितले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या म्हणण्यानुसार आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक धोरण आणि कार्यक्रम हे राज्यघटनेचे अविभाज्य भाग असले पाहिजेत. शेतीचे, मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, प्रत्येक नागरिकासाठी सक्तीची विमा योजना आणि आर्थिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी खासगी उद्योजकांना वाव देण्याच्या आवश्यकतेचा अंतर्भाव असायला हवा. हे कार्यक्रम शाश्वत होण्यासाठी त्यांना राज्यघटनेत मूलभूत गोष्टींचा दर्जा असायला हवा, म्हणजे अशा कार्यक्रमांना विरोध असलेला राजकीय पक्ष सत्तेवर आला तरी त्याला हे कार्यक्रम रद्द करता येणार नाहीत असे बाबासाहेबांचे मत होते. या योजनेला त्यांनी घटनात्मक शासकीय समाजवाद (कॉन्स्टिट्युशनल स्टेट सोशॅलिझम) असे नाव दिले. अर्थात अजून तरी हे शक्य झालेले नाही. अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. आंबेडकर यांनी समाजातील सगळ्याच घटकांचे आर्थिक हित जपले आहे परंतु सद्याच्या राजकीय घडामोडी मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांचे जपलेले हित पुढे नेण्याची गरज असताना त्या कडे दुर्लक्ष केले गेले आहे हे अत्यंत खेदजनक आणि दुःखदायक आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या १३३ व्या जयंती निमित्त त्रिवार अभिवादन

**पत्रकार महेश गायकवाड, सुयश मीडिया ग्रुप सोलापूर**

# चैत्री वारीनिमित्त जड वाहनांच्या वाहतुक मार्गात बदल

सोलापूर/प्रतिनिधीः चैत्री शुध्द एकादशी १९ एप्रिल रोजी असून, या चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. पंढरपूर शहरातून जाणा-या जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात दाखल होणा-या भाविकांच्या जिवितेला धोका व वाहतुकीस अडथळा होवू नये याकरीता जड वाहनांच्या वाहतुक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल दिनांक १७ ते २० एप्रिल २०२४ या कालावधी पर्यंत राहणार आहे. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. पंढरपूर शहरातून जाणारी शासकीय अन्नधान्य, डिझेल पेट्रोल गॅस सिलेंडर, ऊस वाहतुक करणारी वाहने वगळून जड वाहनांची वाहतुक अन्य पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहेत.

मोहोळ पोलीस ठाणे अंतर्गत शिवाजी चौकातून सांगोला कडे जाणारी वाहने मोहोळ- कामती- मंगळवेढा -सांगोला या पर्यायी मार्गाने जातील. वेळापूर कडे जाणारी वाहने मोहोळ- शेटफळ टेंभुर्णी- वेळापूर या पर्यायी मार्गाने जातील. शेटफळ चौकातून वेळापूर कडे जाणारी वाहने शेटफळ- टेंभुर्णी -अकलुज- वेळापूर तर सांगोला कडे जाणारी वाहने शेटफळ- मोहोळ- कामती मंगळवेढा मार्गे सांगोला या पर्यायी मार्गाने जातील. टाकळी सिकंदर येथून जाणारी जड वाहने टाकळी सिकंदर -कुरुल -मोहोळ -शेटफळ -टेंभुर्णी अथवा टाकळी सिकंदर- कुरुल- कामती मंगळवेढा- सांगोला या पर्यायी मार्गाने जातील. कुरुल चौकातून सांगोलाकडे जाणारी वाहने कुरुल - कामती -मंगळवेढा -सांगोला

तर वेळापूर कडे जाणारी वाहने -कुरुल- मोहोळ - शेटफळ- टेंभुर्णी- अकलुज - वेळापूर पर्यायी मार्गाने जातील. वेणेगाव फाटा येथून वेळापूर कडे जाणारी वाहने वेणगाव- टेंभुर्णी -अकलुज - वेळापूर तर सांगोला कडे जाणारी वाहने वेणेगाव -शेटफळ -मोहोळ- कामती- मंगळवेढा मार्गे सांगोला या पर्यायी मार्गाने जातील.

वेळापूर पोलीस ठाणे अंतर्गत श्री ज्ञानेश्वर चौक येथून जाणारी वाहने वेळापूर- टेंभुर्णी- शेटफळ -मोहोळ - कामती मार्गे पुढे जातील. तर साळमुख चौकातून जाणारी वाहने साळमुख- वेळापूर - टेंभुर्णी- शेटफळ- मोहोळ -कामती मार्गे पुढे जातील. तसेच सांगोला पोलीस ठाणे अंतर्गत महुद चौकातून जाणारी वाहने सांगोला- मंगळवेढा- कामती- मोहोळ मार्गे पुढे जातील.मंगळवेढा-कोल्हापूर बायपास पुलाखालून जाणारी वाहने सांगोला-मंगळवेढा- कामती -मोहोळ -शेटफळ -टेंभूर्णी मार्गे पुढे जातील मंगळवेढा नाका येथून जाणारी जड वाहने मंगळवेढा- कामती- मोहोळ- शेटफळ- टेंभुर्णी मार्गे पुढे जातील करकंब-भासे पाटी येथून वेळापूर कडे जाणारी जड वाहने भोसे करकंब -वेणेगाव -टेंभुर्णी -अकलुज- वेळापूर या पर्यायी मार्गाने जातील तर वेळापूर सांगोला कडे जाणारी वाहने करकंब- वेणेगाव- शेटफळ -मोहोळ - कामती -मंगळवेढा- सांगोला मार्गे जातील. वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन श्री. सरदेशपांडे यांनी केले आहे.

# उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रव्दारा ॲथलेटिक्स (मैदानी) या खेळाचे क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन दिनांक १५ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर येथे करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली. परिक्षा कालावधीनंतर उन्हाळयात दीर्घ सुट्टीमध्ये विदयार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुणांना वाव देण्याकरिता प्रति वर्षाप्रमाणे ॲथलेटिक्स खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले जात आहे. या प्रशिक्षण शिबीराकरिता तज्ञ व अनुभवी शासकीय मैदानी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच सूर्यनमस्कार, सर्वांगसुंदर व्यायाम, योगासने, प्राणायाम, ॲरोबिक्स, मनोरंजनात्मक खेळ व व्यक्तीमत्व विकास या बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. या शिबीरात सहभागी होणा-या विदयार्थ्यांना विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. तरी सोलापूर शहर व जिल्हयातील सहभागी होऊ इच्छुकांनी आपली नांवे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे मैदानी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार (संपर्क क्रमांक ९९७०९५३१५ ) यांचेकडे नोंदवावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# 'माझा देश माझी लोकशाही,चल गं करु मतदान लावू बोटाला शाई!'

## उखाण्याद्वारे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितली मतदानाची महती

छत्रपती संभाजीनगर : 'माझा देश माझी लोकशाही, चल गं. करु मतदान लावू बोटाला शाई', या उखाण्यातून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी समोर असलेल्या श्रोतृवर्गाला मतदानाची महती सांगितली. स्वीप उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत वैजापूर येथे आज विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मतदान जनजागृतीच्या घोषणांनी आज वैजापूर नगरी दुमदुमली.



वैजापूर येथे आज मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलिप स्वामी या कार्यक्रमांना हजर होते. उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसिलदार सुनिल सावंत तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी आठ वाजेपासून शहरात रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यात सर्व शासकीय अधिकारी- कर्मचारी,अंगणवाडी सेविका, शालेय विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.रॅलीत लेझीम पथकाचाही समावेश होता. मतदार जनजागृतीच्या घोषणा देऊन शहर दणाणून गेले. डीएड कॉलेजच्या प्रांगणामध्ये रॅलीचा समारोप झाला तेथे विविध कार्यक्रमांनी मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात आला. दीपक त्रिभुवन अव्वल कारकून यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. श्री स्वामी समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. शाहीर अशोक बागुल व त्यांच्या संचाने अतिशय सुंदर पोवाडा सादर करत मतदानाची महती सांगितली.

मतदार जागृती संदेश देणाऱ्या उखाण्यांच्या कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात स्वतः जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्वतः उखाणा सादर केला. त्यांनी घेतलेल्या 'माझा देश माझी लोकशाही चल गं करु मतदान लावू बोटाला शाई' या उखाण्याला उपस्थितांनी दाद दिली. यात्प्रसंगी श्रीमती राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे, दीपक त्रिभुवन, सुचिता हेंगावकर, उर्मिला जेजुरकर,सुरेखा पोटे, कमल खरे, नाजुका गायकवाड, केशव सूर्यवंशी आदींनी उखाणे सादर केले. तलाठी श्रीमीहिंगे यांनी एकपात्री प्रयोग सादर करून लोकशाहीची भावना व्यक्त केली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, मतदानाप्रति कर्तव्य भावना जागरुक व्हायला हवी. आपल्या देशाची लोकशाही बळकट करायची तर मतदानाचे प्रमाण वाढले पाहिजे. त्यासाठी लोकांना मतदान केंद्रांवर विविध सुविधांची उपलब्धता करुन दिली जाणार आहे. त्यात पाणी, सावली, लहान बालकांसाठी पाळणाघर, दिव्यांगासाठी व्हील चेअर, मेडिकल किटइ. विविध सुविधांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. कुणीही मतदानापासून वंचित राहू नये हे आयोगाचे ध्येय्य आहे. तथापि, सगळ्यांना मतदान करता यावे यासाठी मतदार सहायता केंद्रही स्थपन करण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी वैजापूर विधानसभा मतदारसंघ निहाय निवडणूक तयारीचा आढावाही घेतला. यावेळी सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सोलापुर शहर उत्तर विधानसभा प्रमुख वंदना गायकवाड यांनी प्रभागात महिला बैठक आयोजन करण्यात आले. रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार घालुन अभिवादन केले. यावेळी सौ. संस्कृतीवहिनी राम सातपुते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेत आरक्षण केल्यामुळे सर्व समाजातील वंचित घटकांना संसदेत खासदार होण्याचा संधी मिळत आहे. सर्वानी रामभाऊना सोलापुर शहरातुन आमच्या प्रभागातुन लीडजास्त देण्याचा संकल्प केलेत.यावेळी रोहिणीताई तडवळकर, विजया वड्डेपल्ली महिला अध्यक्षा, मा. महापौर शोभा बनशेट्टी, सावीत्रा पल्लाटी, सोशल मिडिया प्रमुख विजया गायकवाड उपस्थित होते



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स ॲंड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# निफाड तालुका कॉंग्रेस कमेटीची बैठक संपन्न



निफाड : निफाड तालुका काँग्रेस कमिटीची बैठक निफाड काँगेस भवन येथे तालुका अध्यक्ष विजय जाधव उर्फ बाबुराव महाराज यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ पदाधिकारी दिगंबर गीते यांच्याअध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा होऊन काही ठराव संमत करण्यात आलेलोकसभेसाठी महविकास आघाडी तर्फे भास्करराव भगरे यांना उमेदवारी जाहीर झाली असून निफाड तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मताधिक्य मिळवून देण्यासाठी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येणार असून सक्षम प्रचार यंत्रणा राबविणार असल्याचे तालुका अध्यक्ष यांनी सांगितले . तालुक्यातील ज्येष्ठ मार्गदर्शक,जुने पदाधिकारी , नव नियुक्त पदाधिकारी व पक्ष सदस्य यांना सोबत घेऊन तालुक्यातील तळागाळातील जनतेपर्यंत पक्षाची विचारधारा पहचविने साठी प्रयत्न करण्याचा सूचना तालुका अध्यक्ष यांनी केल्या तसेच आगामी विधानसभा , जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायत तसेच सहकारी संस्था निवडणुकीत पक्ष सक्रिय सहभाग घेणार असल्याने पक्ष कार्यकर्त्यांनी समाज कार्यात सक्रिय होण्याच्या सूचना वजा आदेश तालुका अध्यक्ष विजय जाधव यांनी केल्याबैठकीस सेवा दलाचे प्रकाश अडसरे, माजी तालुका अध्यक्ष मधुकर शेलार ,ज्येष्ठ पदाधिकारी दिगंबर गीते,युवक काँग्रेस पदाधिकारी सचिन खडताले, तालुका उपाध्यक्ष ड संदेश मोगल,सल्लागार नारायण गुरगुडे ,संपतराव कराड,गणेश धोत्रे,नंदकुमार कापसे, विनायक शिंदे, पुंडलिकराव गायकवाड ड देवरे, वैकुंठ चोपडे,शेरा पठाण,स्वप्नील बिनायकिया,माधवराव नीचीत, सोमनाथ शिंदे, पुजा आप्पा तासकर, नरेंद्र गिते, बाबासाहेब सोमवंशी .मधुसुदन आव्हाड महिला पदाधिकारी रोहिणी शेळके, जिल्हा,तालुका पदाधिकारी आणि पक्ष सदस्य मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते

# जि.प.प्रशाला इटकूर एन.एम.एम.एस. परीक्षेत धाराशिव जिल्ह्यात अव्वल

कळंब/प्रतिनिधीः राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती अर्थात एन.एम.एम.एस. परीक्षा ही इयत्ता ८ वी वर्गासाठी दरवर्षी घेण्यात येते. या परीक्षेतून शिष्यवृत्ती धारक होणाऱ्या विद्यार्थ्यास केंद्र शासनाकडून प्रति वर्ष १२००० प्रमाणे सलग ५ वर्षे एकूण ६०००० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याच प्रमाणे या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सारथी या संस्थेमार्फत प्रति वर्ष १०००० प्रमाणे सलग ४ वर्षे एकूण ४०००० इतकी शिष्यवृत्ती मिळते. धाराशिव जिल्ह्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी जिल्ह्यातून एकूण २०० विद्यार्थी निवडले जातात. इटकूर प्रशालेचे या वर्षी ३९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी एकूण २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि त्यातील एकूण १७ विद्यार्थ्यांनी एकूण ८,४०,००० एवढी भव्य रक्कम शिष्यवृत्ती स्वरूपात कमावली आहे. त्यापैकी ८ विद्यार्थी हे राष्ट्रीय शिष्यवृत्ती धारक आहेत तर ९ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती मिळणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय शिष्यवृत्ती धारक होणारे विद्यार्थी असणारी इटकूर प्रशाला ही धाराशिव जिल्ह्यातील एकमेव प्रशाला असून हा जिल्ह्यातील सर्वोच्च निकाल ठरला आहे.

खालील एकूण १७ विद्यार्थ्यांना मिळणार भरघोस शिष्यवृत्ती.

८ विद्यार्थी राष्ट्रीय शिष्यवृत्ती धारक तर ९ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्ती धारक

**९ राष्ट्रीय शिष्यवृत्ती धारक :** १) आदित्य महेश देवकर २)वैष्णवी विक्रम आडसूळ ३) प्रीती प्रदीप गाडे ४) सिद्धी संतोष कानडे ५) प्रांजली तुकाराम आडसूळ ६) दिव्या वाल्मिक कोळी ७) आसावरी अमोल रणदिवे ६) सार्थक सुरेश सावंत **९ सारथी शिष्यवृत्ती धारक:** १) राधिका रामभाऊ गंभीरे २)प्रतिक्षा दत्तात्रय फरताडे ३)सिद्धी बापूराव आडसूळ ४)आर्या आनंद गाडे ५) दिव्या जनक आडसूळ ६ सिद्धी विकास बावळे ७)समीक्षा बालाजी आडसूळ ८) श्रेयश सतीश बावळे ९) विक्रांत विकास शिंदे

या विद्यार्थ्यांना नाझरीन काझी, अनिल क्षिरसागर, अंजली यादव यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, विस्तार अधिकारी सुशील फुलारी, केंद्रप्रमुख पांडुरंग गामोड, मुख्याध्यापक तुकाराम गरूडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास पावले व सर्व इटकूर अशा सर्व स्तरातून प्रशालेचे अभिनंदन होत आहे.




# पिंपरी (रौ) येथे विद्युत पुरवठा खंडित;नागरीकांचे पाण्यावाचून हाल





नागरिकांना वारंवार होर्णार्या त्रासामुळे येत्या ८ दिवसात विद्युत पुरवठा तारांसह पेटीमधील विद्युततारीका(फ्युज) सह साहित्य दुरूस्त केले गेले नाहीतर मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल. **तुषार गांगुर्डे नाशिक जिल्हाध्यक्ष (मनसे – रोजगार विभाग)**

निफाड/प्रतिनिधीः निफाड तालुक्यातील पिंपरी (रौ) येथिल पिंपळाची डिपी हिची फारच बिकट अवस्था झालेली असून विद्युत वितरण कंपनीचे याकडे दुर्लक्ष असल्याने.मोठी दुर्घटना होऊ शकते,ति त्वरित दुरुस्त करावी गेल्या २ महिन्यात ४ वेळा विद्युत वाहक तारा तुटून पडलेल्या आहेत , ३ –३ दिवस नागरिकांना विद्युत पुरवठा खंडित होत आहे, ऐन उन्हाळ्यात विद्युत पुरवठा खंडित झाल्याने थोडे फार प्रमाणात हक्काचे पाणी असतांनाही पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या पाण्याचा गंभीर प्रश्र्न वारंवार निर्माण होतोय, ह्या भागात ५–६ दिवसापुर्वी बिबट जातीच्या मादीने ४ बछड्यांना जन्म दिल्या मुळे सदर मादीचा दिवसा ढवळ्या वावर होतांना दिसतोय त्यात विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने शेतकरी वर्गामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून ही सर्व परिस्थिती बघता नागरिकांचा संताप होतांना दिसतोय विद्युत पुरवठा सुरळीत करुन शेतकरी वर्गाला भयमुक्त करावे अशी मागणी मनसेचे नाशिक जिल्हा अध्यक्ष तुषार गांगुर्डे ,सचिन जाधव, शेखर गांगुर्डे, काशिनाथ बेरड, गोरख महाजन, आदींसह नागरिकांनी केली आहे.

# धरित्री विद्यालयात पक्षांप्रती दाखविला जिव्हाळा

नळदुर्ग/प्रतिनिधीः ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित धरित्री विघालय येथे विविध उपक्रम घेतले प्लास्टिक मुक्त अभियान व पक्ष्यांसाठी अन्न व पाणी दुहेरी उपक्रम साजरा धरित्री विद्यालयाचे महाराष्ट्र राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त तथा मुख्याध्यापक सुनील पुजारी सुकला पालापाचोळा आला कडक उन्हाळा ठेवूनी चारा पाणी अंगणात पक्षांप्रती दाखवा जिव्हाळा असे मत यांनी मांडले सध्या ❋उन्हाळा असल्यामुळे पशुपक्ष्यांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते.या आवाहनास प्रत्युत्तर म्हणून पर्यावरण संरक्षक व पशु प्रेमी विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या आजूबाजूच्या परिसरातील टाकून दिलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या गोळा केल्या.बाटल्यांपासून पक्षांसाठी अन्न व पाणी देता येईल असे हँगिंग बाऊल तयार केले. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या व हिरव्या झाडांनी नटलेल्या धरित्री मध्ये प्रत्येक झाडावर विद्यार्थ्यांच्या हस्ते पक्षांसाठी




वेगवेगळ्या प्रकारचे धान्य हँगिंग बाऊल मध्ये ठेवण्यात आले.यामध्ये विद्यार्थ्यांनी तांदूळ,गहू,ज्वारी, मूग, मटकी, हरभरा अशी वेगवेगळ्या प्रकारची कडधान्ये घरातून आणले होते. काही विद्यार्थ्यांनी घरातील प्लास्टिकच्या डब्यापासून देखील बाऊल तयार करून आणले होते. उन्हाळ्याच्या दिवसात नळदुर्ग मध्ये माणसांसाठी पाणी मिळणे दुरापास्त झाले असताना आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पशुपक्ष्यांची अन्न पाण्याची काळजी घेणे खरंच मानवतेचे दर्शन घडवणारे आहे असे उद्गार ज्ञानदीप कलोपासक मंडळाचे अध्यक्ष बाबुरावजी चव्हाण त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना काढले .संस्थेचे सचिव .सयाजीराव शिंदे यांनी देखील विद्यार्थ्यातील सामाजिक जाणीव व पशुपक्षां प्रति असलेली सहानुभूती याचे कौतुक केले.महाराष्ट्र राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त तथा मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी सर्वप्रथम पक्षांसाठी पाणी व अन्न हँगिंग बाऊलमध्ये ठेवून ते झाडाला अडकवले व या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये असणाऱ्या प्रत्येक झाडावर अन्न व पाण्याचे बाऊल अडकवले. या उपक्रमाद्वारे पर्यावरणातील नष्ट न होणाऱ्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्यात आला. निसर्गाच्या सानिध्यात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमधील सामाजिक जबाबदारीची जाणीव पाहून पालकांनी आनंद व्यक्त केला. ज्ञानदीप कलोपासक मंडळाचे सर्व सदस्य कोषाध्याक्ष मल्लिनाथ माळगे , सहसचिव वसंतराव रामदासी , किरण पाटील ,विघार्थी व शिक्षकांचे कौतुक यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना आपल्या शुभेच्छा पाठवल्या. या कार्यक्रमाचे नियोजन प्रमुख शुभांगी कारंजे व सूत्रसंचालन श्री चव्हाण रमेश यांनी केले तर आभार श्री सातलगावकर अण्णाप्पा यांनी मानले.या उपक्रमात शाळेतील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. खेळी-मेळीच्या व उत्साहाच्या वातावरणात उपक्रम संपन्न झाला.

# स्वराज्य पोलीस मित्र संघटनेची जिल्हा कार्यकारणी जाहीर

## जिल्हाध्यक्ष संजय जाधव,तर उपाध्यक्ष दीपक गाजरे, लहानु बोरगुडे,यांची निवड



निफाड/प्रतिनिधीः समाजात वाढणाऱ्या अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार ,या विरोधात लढणाऱ्या स्वराज्य पोलीस मित्र, माहिती अधिकार, पत्रकार संरक्षण, या संघटनेची जम्बो कार्यकारणी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक कांबळे महासचिव कमलेश शेवाळे यांचे आदेशाने व संघटनेचे जिल्हा मार्गदर्शक निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे तसेच राज्य संघटक पत्रकार राजेंद्र जी थोरात यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये स्वराज्य पोलीस मित्र संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी संजय जाधव तर जिल्हा उपाध्यक्षपदी दीपक गाजरे लहानुभाऊ बोरगुडे यांची एकमताने निवड करण्यात आली,स्वराज्य पोलीस मित्र संघटनेचे संपूर्ण भारत कार्यक्षेत्र असून समाजात अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार ,या विरोधात लढणारी एकमेव संघटना आहे माहिती अधिकार, पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण, या तीन घटकांवरती ही संघटना काम करते, निफाड येथे नुकतीच या संघटनेची बैठक संपन्न झाली असून यामध्ये जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली ,यामध्ये जिल्हा संपर्कप्रमुख पदी बाबुराव वाढवणे, मुजफ्फर शेख लाल शेख, संघटक पदी जमीर बशीर शेख, सल्लागार हरीश कुमार लोहार, सचिव विठ्ठल नरहरी कोटकर, सरचिटणीस नंदकुमार कापसे, तर नाशिक शहर अध्यक्षपदी अशोक गांगुर्डे, निफाड तालुका अध्यक्षपदी संजय पाटोळे, येवला तालुका अध्यक्ष वेनुनाथ फापाळे, दिंडोरी तालुका अध्यक्ष केशव हिरे ,दीपक जमदाडे ,कोपरगाव तालुका अध्यक्ष उत्तमराव चळवळ ,यांची एकमेकांनी निवड करण्यात आली असून जिल्ह्यातील तालुका कार्यकारणी लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य संघटक राजेंद्रजी थोरात यांनी दिली , याप्रसंगी विजय सोमवंशी, पंकज सोमवंशी, सागर अहिरे, गोकुळ कानडे, माणिक गायकवाड, धनंजय कापसे, श्रीकृष्ण खाडे, मुलांनी सर्वर, जमशेद युसुफ तांबोळी, श्याम गोळे, बाळकृष्ण अहिरे ,राजेंद्र शेजवळ ,ज्ञानेश्र्वर आव्हाड, सागर बोराडे, अरविंद मराठे, ज्ञानेश्र्वर आंधळे ,,ज्ञानेश्र्वर सोनवणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# स्वेरीत महात्मा फुले यांची १९७ वी जयंती साजरी




पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये थोर समाज सुधारक,स्त्री शिक्षणाचे प्रेरक आणि जनक महात्मा जोतिराव फुले यांच्या १९७ वी जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने सुरवातीला अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.के.बी. पाटील यांच्या हस्ते महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी महात्मा जोतीराव फुले यांचा जीवनपट उलगडून दाखवताना सांगितले की, 'थोर समाजसुधारक महात्मा फुले यांचे शिक्षण व सामाजिक क्षेत्रात अनमोल योगदान असून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातून सर्वांना स्फूर्ती मिळते. महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते,विचारवंत,समाजसुधारक आणि लेखक म्हणून आपण त्यांच्याकडे पाहतो. सामाजिक प्रबोधन,अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन तसेच स्त्रियांना व समाजातील मागास घटकांना शिक्षण देण्याचे महान कार्य त्यांनी अखंडपणे कार्य केले. तत्कालीन समाजातील जातिभेद,अनिष्ट प्रथा,तसेच समाजातील प्रस्थापितांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली दिसून येते. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतात. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे. त्यांच्या सामाजिक योगदानामुळेच आज समाजात स्त्री व पुरुष खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत.'असे सांगून त्यांनी म.फुले यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले.

यावेळी शिक्षक डी.एन,डुचाळ,ओंकार मोहीकर,वाय.डी.जाधव,आदित्य अलट,व्ही.एम.चव्हाण तसेच स्वेरीचे डॉ.एच.बी.रोंगे,प्रा. यु. एल. अनुसे, इतर प्राध्यापकवर्ग,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# समर्थ महाप्रसाद सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात आले होते. सदर उपक्रमांतर्गत न्यासाकडून एप्रिल महिन्यातील कीटचे वाटप शनिवारी करण्यात आले.

दरम्यान गेल्या मकर संक्रांतीच्या दिवशी सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३६ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

याबरोबरच समर्थ महाप्रसाद सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनंसांचा समावेश आहे. तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७३ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सिद्धेश्र्वर मोरे, सौरभ मोरे, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, गोठू माने, बाबुराव जाधव, पुरोहित संजय कुलकर्णी व विश्र्वंभर पुजारी, एस.के.स्वामी, दिनेश हळगोदे, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, कल्याण देशमुख, सुमित कल्याणी, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# वागदरी येथे परमेश्वर यात्रे निमित्त शिवाजी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन



अक्कलकोट/प्रतिनिभीः अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचे ग्रामदैवत श्री परमेश्र्वर महाराज यात्रा महोत्सवानिमित्त दिनांक १३ एप्रिल व १४ एप्रिल रोजी श्री शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्था वागदरीतर्फे श्री परमेश्र्वर महाराज यांच्या भक्तगणासाठी पाणपोईचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या पाणपोईचे उद्धाटन सकल मराठा समाज वागदरीचे दानशूर युवा धडाडीचे कार्यकर्ते सचिन पाटील व सकल मराठा समाज ट्रस्टचे अध्यक्ष श्री शिवाजी यशवंत सावंत यांच्या हस्ते करण्यात आले प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले याप्रसंगी सकल मराठा समाजाचे मार्गदर्शक श्रीयुत दिनकर जावळे सर ट्रस्टचे उपाध्यक्ष श्री तानाजी हेबळे

श्री.कमलाकर सोनकांबळे उपसरपंच गोगाव.श्री स्वामीराव यादव, श्री सिद्धाराम इंगळे मेजर ,श्री.काशिनाथ कदम,श्री.ईश्र्वर शिंदे,नितीन हेबळे ,श्री चंद्रकांत कणसे, श्री एकनाथ माने, श्री नागनाथ अवताडे, श्री राज शिंदे, श्री अनिल शिंदे ,श्री सज्जन हेबळे ,अक्षय सावंत ,विशाल सावंत,अंबादास हेबळे, श्री राहुल शिंदे, श्री शामराव बाबर ,श्री परमेश्र्वर शंकर सावंत, श्री मल्लू शिंदे ,अंबादास जाधव ,दत्ता हेबळे,राम मोरे, श्री परमेश्र्वर विष्णू सावंत, श्री अक्षय सावंत ,श्री विशाल बापू सावंत ,अंबादास शिंदे,अजय साळुंखे,बबलू शिंदे ,रतन जाधव यांच्या सह असंख्य समाज बांधव व गावकरी मंडळी उपस्थित होते.








